**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

**कौशल्य विकासावर आधारित रोजगाराभिमुख अभ्यासक्रम महाविद्यालयांनी यशस्वीपणे चालवावे - कुलगुरू**

**विद्यार्थी कौशल्याधिष्ठीत होवून त्यांना रोजगाराच्या अनेक संधी मिळाव्यात**

**विद्यापीठात कौशल्य विकासावर आधारित रोजगाराभिमुख व नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम निर्मिती कार्यशाळा संपन्न**

अमरावती.

रोजगार निर्मिती करण्यावर देशपातळीवर विविध संस्थांच्या माध्यमातून अथक प्रयत्न केले जात आहे. युवकांना जास्तीतजास्त रोजगार मिळावा, याकरिता त्यांच्याकडे कौशल्य असण्याची गरज आहे. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या माध्यमातून कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम तयार करण्यात येतात. हे अभ्यासक्रम पाचही जिल्ह्यांतील महाविद्यालयांनी आपल्या स्तरावर यशस्वीपणे राबवावेत. विद्यार्थी कौशल्याधिष्ठीत करावेत आणि त्यांना रोजगाराच्या अनेक संधी त्या माध्यमातून मिळाव्यात, यादृष्टीने कौशल्य विकासावर आधारित रोजगाराभिमुख व नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम निर्मिती कार्यशाळा मैलाचा दगड ठरेल, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने कौशल्य विकासावर आधारित रोजगाराभिमुख व नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले, त्याप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.डी.डब्ल्यु. निचित, ह.व्या.प्र. मंडळाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे, विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे पुढे म्हणाले, पारंपारिक शिक्षणासह विद्यार्थ्यांना कौशल्य देणे वर्तमानकाळाची गरज झाली आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार कौशल्यावर आधारित शिक्षण देण्याकरिता आणि विद्यार्थ्यांना त्यांचे कौशल्य वाढविण्यासाठी मदत व्हावी, याकरिता विद्यापीठाने या शैक्षणिक सत्रापासून सी.बी.सी.एस. प्रणाली अभ्यासक्रमामध्ये आणली आहे. त्यामुळे विद्यार्थ्याला बहुविद्याशाखीय कौशल्य विकासावर आधारित कौशल्य विकासाचे अभ्यासक्रम पूर्ण करता येतील. विद्यार्थ्यांकडे कौशल्य प्राप्त झाल्यानंतर त्यांना रोजगाराच्या अनेक संधी निश्चितच मिळतील, याशिवाय ते स्वयंरोजगार सुद्धा करु शकतील. विद्यार्थ्यांना रोजगाराक्षम बनविण्यासाठी कुलगुरू म्हणून मी सातत्याने प्रयत्न करीत आहे. विद्यापीठाच्या प्रयत्नाला पाचही जिल्ह्यांतील महाविद्यालयांची समर्थ साथ लाभत आहे, असेहे ते याप्रसंगी म्हणाले.

प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे 'आऊटकम बेस्ड स्कील एज्युकेशन' विषयाच्या अनुषंगाने म्हणाले, शिक्षण प्रक्रियेतील विद्यार्थी हा महत्वाचा घटक आहे. एन.ई.पी. २०२० आणि स्कील इंडिया यातून सर्वात मोठे बदल शिक्षण व्यवस्थेत झाले आहे. विद्यार्थ्यांना केवळ पदवी देण्यापेक्षा कौशल्य विकासावर आधारित रोजगाराभिमुख आणि नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम उपलब्ध करुन देण्यासाठी महाविद्यालयांनी पुढाकार घ्यावा. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान आकलनासोबतच दृष्टीकोन आणि वर्णात्मक बदल होईल. कौशल्य क्षमता निर्माण करणारे मॉड्युल तयार करतांना प्रादेशिक व भाषिक दृष्ट्या घटकांचा विचार करावा, असेही ते म्हणाले.

कार्यशाळेचे प्रास्ताविक विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले. कार्यशाळा आयोजनामागील भूमिका विशद करतांना महाविद्यालयीन स्वतरावर एन.जी.ओ. च्या माध्यमातून किंवा खाजगी संस्थांच्या माध्यमातून कौशल्य विकासावर आधारित रोजगाराभिमुख आणि नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमांची गरज व उपयोगिता, त्यासाठी लागणारे भौतिक मनुष्यबळ, व्यवस्थापन आणि अशाप्रकारचे अभ्यासक्रम चालविण्याबाबत प्रस्ताव, याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली.

विद्यापीठ गीताने कार्यशाळेला सुरुवात झाली. कर्मयोगी श्री संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व मेणबत्ती पूजन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयांचे प्राचार्य व प्राध्यापकांनी कौशल्याभिमुख अभ्यासक्रम राबवितांना येणारे अनुभव व्यक्त केले. संचालन डॉ. रोहिणी देशमुख यांनी, तर आभार आदित्य पुंड यांनी मानले. कार्यशाळेच्या आयोजनासाठी विभागातील डॉ. प्रशांत भगत, प्रा. मंजुषा बारबुद्धे, प्रा. मनिषा लकडे, प्रा. जुबेर खान, प्रा. सुरेश पवार, प्रा. वैभव जिसकार, प्रा. शिवानी अग्रवाल, प्रा. अखिलेश अग्रवाल, प्रा. राधिका खडके, प्रा. स्वप्नील ईखार, प्रा. स्वप्नील मोरे आदींनी अथक परिश्रम घेतलेत.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २३/०७/२०२२.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

[C:\Users\PRO\Desktop\OM\UNIVERSITY NEWS 2022 179

This document was created with the Win2PDF “Print to PDF” printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/